**दिनांक २२.०५.२०२५ रोजी–**

**अभियोग पक्षाचा सा. क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची पुढील जबानी शपथेवर सुरू–**
**अभियोग पक्षा करीता विद्वान सौ. राऊत एम.एस., सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –**

३. विभागीय क्रिडा संकुल समिती याच्यासाठी जो काही शासकिय निधी येतो त्या निधीचे नियोजन करण्यासाठी इंडीयन बँक, शाखा जालना रोड, औरंगाबाद येथे खाते उघडण्यात आले. या सेव्हींग खात्याचा क्रमांक ५००८५४९५७०७ असा आहे. शासनाचा जो काही निधी विभागीय क्रिडा संकुल समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्यासाठी जो येत होतो तो या खात्यात जमा करण्यात येत होता. या निधीचा उपयोग विभागीय क्रिडा समितीचे दैनंदिन कामकाज ज्यामध्ये कर्मचा–यांचे पगार, महानगरपालिका अथवा अन्य काही कर तसेच काही बांधकाम वगैरे झालेले असल्यास त्याच्या रकमा देण्याकरीता केला जात होता. या बँकेच्या खातेचे कामकाज हे फक्त धनादेश अथवा आर.टी.जी.एस.नुसारच चालत. तत्कालीन विभागीय क्रिडा संकुल समितीचे अध्यक्ष यांचे निर्देशाप्रमाणे ह्या खात्याचे कामकाज हे सदस्य सचिव यांच्या एकट्याच्या सहीने चालेल असे निर्देश होते. त्याप्रमाणे इंडीयन बँकेला तत्कालीन सदस्य सचिव यांचा सही नमुना दिलेला होता. हे खाते चालण्याच्या पद्धतीचा निर्देश मार्च–२०१९ मध्ये देण्यात आला होता. यासाठी बँकेला विभागीय क्रिडा संकुल समितीने पत्र दिले होते व पत्रासोबतच सही नमुना दिलेला होता. मी हे पत्र पोलीसांना दिलं होत. ते पत्र दाखविल्यास मी ओळखेल. या पत्राच्या नुसार विभागीय क्रिडा संकुल समितीचे सर्व व्यवहार हे सदस्य सचिवांच्या सहीने या बँके मार्फत होत.

४. बँक खात्याच्यावरून विभागीय क्रिडा संकुल समितीसाठी जे काही आर्थीक व्यवहारा होत अथवा पैश्यांची देवाण घेवाण होत असे या विषयीची सर्व नोंद ही विभागीय क्रिडा संकुल समितीचे लिपीक हे कार्यालयाच्या रोकड–नोंदवहीत घेत. ह्या नोंदी घेतल्यानंतर उपसंचालक त्या नोंदी तपासत. त्यानंतर मगच ते त्या रोकड–नोंदवहीवर ते सही करीत असे. जे काही खर्च होत होते त्या विषयी प्रथम कार्यालयीन टिपणी तयार होत असे. मग ती कार्यालयीन टिपणी ही प्रथम उपसंचालक सही करत आणि मग ती अंतिम मंजुरीकरीता जिल्हाधिकारी यांच्याकडे दिली जायची. जिल्हाधिकारी यांच्याकडुन त्या खर्चाला मंजुरी मिळाल्यावर मगच त्या रकमेचा धनादेशाद्वारे ती रक्कम अदा केली जायची. धनादेशावर सदस्य सचिवांची सही होत होती. आमच्या कार्यालयात पत्र व्यवहार जो केला जात त्यासाठी ईमेला आयडी होता. हा ई–मेल आयडी dydsportsabad@gmail.com असा होता. हा आमच्या कार्यालयाचा अधिकृत ई–मेल आयडी होता. आमच्या कार्यालयात जो काही पत्रव्यवहार येत होता हा सर्व या ई–मेल आयडीवर येत होता. आमच्या कार्यालयात बँकेमार्फत जो काही पत्र व्यवहार होत हा सर्व याच

ई–मेल आयडीद्वारे होत असे. बँकेकडुन हो काही व्यवहार होत हा सर्व व्यवहार आर्थीक व्यवहारावर होत असत.

५. सप्टेंबर–२०२३ पासून श्री. संजय सबनीस हे विभागीय क्रिडा संकुल समिती, छत्रपती संभाजीनगरचे सदस्य सचिव म्हणून नियुक्त होते. सदस्य सचिव म्हणून यांच्या सहीने बँकेचे सर्व व्यवहार चालत. दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी श्री. संजय सबनीस यांनी ते सदस्य सचिव असून बँकेच्या व्यवहाराबद्दलचे त्यांनी बँकेला पत्र दिले व त्यासोबत स्वाक्षरी नमुना त्यांनी बँकेला दिला.

६. विभागीय क्रिडा संकुल समितीचे जे दैनंदिन कामकाज चालायचे त्या साठी लागणा–या कर्मचा–यांची नियुक्ती ही बाह्य स्त्रोत यंत्रणेमार्फत करण्यात आलेली होती. फेब्रुवारी–२०२२ मध्ये विभागीय क्रिडा संकुल समितीचे बाह्य स्त्रोत यंत्रणेचे कामकाज हे दिशा फॅसिलीटीज यांना देण्यात आले होत. या दिशा फॅसिलीटीज यांचे मार्फत संगणक ऑपरेटर– हर्षकुमार क्षिरसागर यांनी नेमणुक केली होती. या दिशा फॅसिलीटीजच्या नेमलेल्या कर्मचा–यांची नियुक्ती ही कंत्राटी पद्धतीची होती. ही नियुक्ती ही दैनंदिन कामकाज ज्यामध्ये लेखा लिपीक, संगणक ऑपरेटर व स्वच्छता अथवा साफ सफाई कर्मचारी म्हणून केली जात.

७. सन २०२३ साली वेव्ह मल्टीसव्हीसेस या बाह्य यंत्रणेला त्याच्या पुढच्या वर्षी कर्मचारी पुरविण्याबद्दल कामकाज देण्यात आले. वेव्ह मल्टीसव्हीसेस यांनी संगणक ऑपरेटर व लिपीक म्हणून हर्षकुमार क्षिरसागर तसेच लेखा लिपीक म्हणून यशोदा शेट्टी यांची नियुक्ती केली. वेव्ह मल्टीसव्हीसेस यांनी एकूण एकोणावीस कर्मचारी विभागीय क्रिडा संकुल समितीत नियुक्त केले होते. मी पोलीसांना ह्या एकोणावीस कर्मचा–यांची यादी दिली होती. ही यादी मला दाखविल्यास मी ओळखेल.

**सहाय्यक सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उर्वरीत सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| **–/स्वाक्षरीत/–** | **–/स्वाक्षरीत/–** |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक– २२/०५/२०२५